<u>नियमित फौजदारी खटला क्र.९८/२०२२</u>
<u>निशाणी क्र.१८</u>

## <u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ३ ची साक्ष</u>

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| नाव | :- | अनिल भाईदास कोळी, |
| वय | :- | ४९ वर्ष, |
| व्यवसाय | :- | शेती , |
| राहणार | :- | अक्कडसे, ता.शिंदखेडा, जि. धुळे, |

.................................................................................................................

**<u>सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सरकारी विधीज्ञ श्री. सी.पी.चव्हाण यांचे मार्फत.</u>**

दि.२३.०६.२०२२ रोजी मी घरी होतो. त्यावेळी पोलीस पंचनामा करण्यासाठी आले होते. त्यामुळे मी लतीश पवार यांच्या शेतात गेलो होतो. त्याठिकाणी जळालेल्या ऊसाचा पंचनामा पोलीसांनी माझ्यासमक्ष केला. त्याठिकाणी मी हजर होतो. प्रस्तुतचा घटनास्थळ पंचनामा मी वाचला होता. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. घटनास्थळ पंचनाम्यावर अ.क्र.१ वर माझी सही आहे. घटनास्थळ पंचनाम्याला **<u>निशाणी क्र.१९ पी/सा.क्र.३</u>** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री.बी.व्ही.सोनवणे यांचे मार्फत.**

माझे शिक्षण इयत्ता १० वी पर्यंत झाले आहे. पोलीसांनी मला ज्या शेतात पंचनामा करण्यासाठी बोलावले होते त्या शेताचा ७/१२ उतारा मी पाहिला नव्हता. त्याचप्रमाणे पोलीसांनी देखील त्या शेताचा ७/१२ उतारा मला दाखवला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा लिहुन ठेवला होता आणि त्यावर फक्त माझी सही घेतली. हे म्हणणे खरे आहे की, असे काही झाले नाही की, मी सांगत होतो त्याप्रमाणे पोलीस घटनास्थळ पंचनामा लिहित होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी

घटनास्थळ पंचनाम्यात काय लिहिले आहे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, लतिश शिवाजी पवार हे माझ्या गावातील राहणारे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्यांचेशी माझे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने सांगितल्यामुळे मी घटनास्थळ पंचनाम्यावर सही केली.

हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकुर की, "दि.२३.०६.२०२२ रोजी मी घरी होतो. त्यावेळी पोलीस पंचनामा करण्यासाठी आले होते. त्यामुळे मी लतीश पवार यांच्या शेतात गेलो होतो. त्याठिकाणी पोलीसांनी जळालेल्या ऊसाचा पंचनामा माझ्यासमक्ष केला. त्याठिकाणी मी हजर होतो. प्रस्तुतचा घटनास्थळ पंचनामा मी वाचला होता. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. घटनास्थळ पंचनाम्यावर अ.क्र.१ वर माझी सही आहे.'' हा मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीला मदत व्हावी म्हणुन आजरोजी न्यायालयात मी साक्ष देण्यासाठी आलो आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/---
(विनिता आ. नाईक)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२) शिंदखेडा

दिनांकः- ०३/०४/२०२५

-: प्रमाणपत्र :-

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईलमधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकुराशी शब्द-न-शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :- | सचिन अरुण परदेशी |
| न्यायालयाचे नाव | :- | सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, शिंदखेडा, जि. धुळे. |

आदेश अपलोड केलेचा दिनांक :- ०३/०४/२०२५

सही/---
लघुलेखक, श्रेणी-३
सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, शिंदखेडा